Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९८ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राम मंदिर होतेय याला महत्त्व,पैशाला नाही

## ठाकरे, राऊतांना झोपेत सुद्धा सरकार पडण्याच्या तारखा दिसतात–संदीपान भुमरे



**छत्रपती संभाजीनगर–**कोणी किती पैसे दिले, यापेक्षा राम मंदिर होत आहे याचा आनंद आहे. आम्ही अनेक वेळा अयोध्या दौरा केला आहे. कुणी काय दिले या पेक्षा मंदिर होत आहे याला महत्त्व आहे; पैशाला महत्व नाही. राम मंदिरासाठी त्यावेळी शिवसेनेतील सर्वांनीच सहभाग दिला असल्याचे सांगत उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या १ कोटीच्या राम मंदिर देणगीवर रोहयो मंत्री संदीपान भुमरे यांनी ठाकरे यांना टोला लगावला आहे.

दरम्यान संदीपान भुमरे पुढे बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांना झोपेत सुद्धा सरकार पडण्याच्या तारखा दिसतात. सरकार कधी जाणार हे सांगणारे संजय राऊत, उद्धव ठाकरे भविष्यकार आहेत. झोपीतून उठले की त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमचे सरकार दिसते. त्यांना रात्री झोपीत स्वप्न पडतात १ तारीख २ तारीख अशा तारखा दिसतात ते सकाळी उठून माध्यमसमोर बोलतात.संदीपान भुमरे म्हणाले की, आम्ही बिनधास्त आहे. १० तारखेच्या निकालाची आम्हाला धाकधूक वाटत नाही. समोरच्याला धाकधूक आहे. आम्ही जे काही केले ते कायदेशीर बाजू तपासून केले आहे. आम्हाला न्याय देवतेवर विश्वास आहे . निकाल आमच्या बाजूने लागेल, अशी प्रतिक्रिया भूमरे यांनी आमदार अपात्र प्रकरणावर दिली आहे.राज्यात सध्या राम मंदिर सोहळयाच्या निमंत्रणावरून वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून सातत्याने भाजपवर टीका केली जात आहे. त्यातच राम मंदिराचे प्रमुख पुजारी अचार्य सत्येंद्र दास यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याबद्दल मोठे विधान करत टीका केली आहे. जे राम भक्त आहेत केवळ त्यांनाच निमंत्रण देण्यात आल्याचे म्हणत पुजारी सत्येंद्र दास यांनी उद्धव ठाकरे, राऊतांवर निशाणा साधला आहे.



# भद्रावतीतील विजासन लेणीतील भगवान गौतम बुध्दाची मुर्ती भग्न

## आ.प्रतिभाताई धानोरकरांची पोलिसांना तात्काळ कारवाईची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भद्रावती येथील ऐतिहासिक विजासन लेणी येथे भगवान गौतम बुध्दाच्या प्राचीन मुर्ती आहेत. यापैकी वरील भागात असलेल्या एका मुर्तीला दि. ३१ डिसेंबर २०२३ चे रात्रीतून अज्ञातांनी भग्न करुन विटंबना केल्याचा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे वरोरा–भद्रावती विधानसभा क्षेत्रात खळबळ उडाली आहे.या प्रकरणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी चंद्रपूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेशी यांना पत्र लिहून तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. पत्रात धानोरकर यांनी म्हटले आहे की, वरोरा–भद्रावती विधानसभा क्षेत्रातील नागरिक शांतताप्रिय, जातीय सलोखा तसेच कायदा व सुव्यवस्थेला सहकार्य करणारे आहेत. परंतु अशा प्रकारच्या घटनांमुळे जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात त्वरित कारवाई करून दोषींना अटक करणे आवश्यक आहे.आमदार प्रतिभा धानोरकर यांनी पोलिस प्रशासनाला तात्काळ दोषींना अटक करण्याची विनंती केली आहे. अन्यथा भद्रावती तालुका काँग्रेस रस्त्यावर उतरुन न्यायासाठी तीव्र आंदोलन करेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.



# भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिवपदी शकील खान

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते शकील खान शेरखान यांची भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्च्याच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिसजी मुलतानी यांनी ही घोषणा केली.



नवनियुक्त अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिव शकील खान यांनी आपल्या नियुक्तीबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,अल्पसंख्यांक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष जमालभाई सिद्धिकी, प्रदेश अध्यक्ष ईद्रीस मुलतानी,प्रदेश महामंत्री जुनेद खान,ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, खा. रामदास तडस, जिल्हा अध्यक्ष सुनिल गफाट,आ.रामदास आंबटकर, राजेश बकाने यांचे आभार मानले आहे. भारतीय जनता पार्टीत अल्पसंख्यांक समाजाला मोठया प्रमाणात समाविष्ट करून अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निरंतर प्रयत्नशील राहील, असे मनोगत यावेळी शकील खान यांनी व्यक्त केले. शकील खान यांचे ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे, प्रदेश सदस्य राजीव बत्रा, चंद्रशेखर बेले, संदीप बोरकुटे, हाजी निसार अहमद, राजेश गुप्ता, सलमान पठाण, नियाज अली, अनिल लेकुरवाळे, शारिक अली, गजानन सरदार यांनी अभिनंदन केले आहे.

# बांबू विणकाम प्रशिक्षणातून महिलांना मिळाले उपजीविकेचे साधन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तार होत असलेल्या बांबू क्षेत्रात प्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना उपजीविकेचे साधन प्राप्त व्हावे,या उद्देशाने बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (बीआरटीसी) तर्फे लोहारा येथे आयोजित १५ दिवसीय बांबू विणकाम प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. प्रशिक्षण आपल्या दारी या बीआरटीसी च्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून गावातील २० महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

बाजारपेठेत असलेली बांबू मॅट ची वाढती मागणी लक्षात घेता महिलांना विविध प्रकारचे बांबू मॅट तयार करण्याच्या प्रशिक्षणाचा लाभ आवश्यक साधनसामुग्रीसह देण्यात आला. या प्रसंगी महिलांनी प्रशिक्षणातून तयार केलेल्या विविध बांबू मॅटची प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. ज्यामधे जिल्ह्यातील विविध बांबू वस्तू उत्पादक व खरेदीदार यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवून महिलांनी तयार केलेल्या विविध बांबू मॅटचे कौतुक केले. अशा प्रशिक्षणातून ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक विकास होईल,असा विश्वास केंद्राचे संचालक अविनाश कुमार यांनी कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केला. यावेळी सरपंच किरण चालखुरे,बीआरटीसी चे वनपरिक्षेत्र अधिकारी ए. डी. मल्लेलवार,प्रशिक्षक किशोर गायकवाड,संतोष बजाईत,बांबू उद्योजक अन्नपूर्णा धूर्वे,अनिल दहागावकर,बांस कंपनी लोहाराचे ऐश्वर्य बांगडे आणि गावकरी उपस्थित होते.

# तायकांडो या खेळात सिया दुबे ला कास्य पदक




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय यशबोध ज्ञानप्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूलची विदयार्थीनी सिया दुबे हिने राज्य स्तरावर कौतुकास्पद यश संपादन केले आहे.लातूर येथे १७ वर्षा आंतील– राज्य स्तरावर झालेल्या तायकांडो या स्पर्धेत सेंट जॉन हायस्कूल पुलगावची सिया दुबे हिने ६३ किलो वजन गटात यश संपादन करून कांस्य पदक प्राप्त केले.यशस्वी विदयार्थीनीचे शाळेच्या अध्यक्ष प्रिती बोरसे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती कुरझडकर, उपप्राचार्य महेंद्र भोयर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि भविष्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तिचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सत्यम कोथलकर,वैभव शिरभाते यांचे सुद्धा सर्वांनी अभिनंदन केले.

# महायुतीमधील गुंता वाढला; सदाशिव लोखंडे यांची उमेदवारी धोक्यात?–रामदास आठवले

**अहमदनगर–**एनडीएमध्ये निमंत्रक किंवा संयोजक पदावरून कोणताही वाद नाही. आम्हाला देशभरात लोकसभेच्या दहा जागा मिळाव्यात. त्यातील दोन जागा महाराष्ट्रातील मिळाव्यात, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले यांनी केली. राज्यात ज्या दोन जागा आम्ही मागत आहोत त्यात शिर्डी येथील जागा आहे. शिर्डीमधून आपण स्वत: लोकसभेची निवडणूक लढवणार असल्याचे रामदास आठवले यांनी म्हटले आहे. रामदास आठवले यांच्या या दाव्यामुळे शिवसेनेचे विद्यामान खासदार सदाशिव लोखंडे यांच्यासमोर अडचण निर्माण होणार आहे.दरम्यान रामदास आठवले सोलापूर आणि शिर्डी राखीव लोकसभा मतदारसंघ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला द्या, अशी मागणी अक्कलकोट आरपीआयच्या वतीने भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदनाद्वारे केली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघ आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांना तर सोलापूर लोकसभा मतदारसंघ आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांना उमेदवारी द्यावी, असे त्यांनी म्हटले आहे.केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले की, लोकसभेसंदर्भात ओपिनियन पोलमध्ये महायुतीला कमी जागा दाखवल्या. परंतु आम्ही ४० जागा जिंकणार आहोत. यापूर्वीचे निवडणुकांमधील सर्वे काय होते आणि निकाल काय आले, हे सर्वांनी पाहिले आहे. देशात निर्माण करण्यात आलेली इंडिया आघाडी ही विकासासाठी नसून फक्त मोदींना हरविण्यासाठी आहे. ज्या पद्धतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्ष करायला शिकवले आहे.अन्याय विरुद्ध लढा द्यायचं शिकवलं आहे. त्याच पद्धतीने लढा देण्याचं संकल्प आम्ही करत आहोत. हे नवीन वर्ष देशासाठी तसेच दलितांच्या साठी खूपच महत्त्वाचे आहे.रामदास आठवले म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये जिंकणे आणि त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीत महायुतीला विजय मिळवून देणे हाच माझा नवीन वर्षाचा संकल्प आहे. आगामी निवडणुका आम्ही रिपब्लिक पक्षाच्या माध्यमातून लढवणार आहे. त्यासाठी चिन्ह मिळविण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. एनडीएमधील राज्यातील घटक लक्ष त्यांच्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्हाला ४०० च्या पुढे जागा जिंकायच्या आहेत.

# अर्धवट मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे चुकीचे – नाना पटोले

**मुंबई–**केंद्रातील मोदी सरकारने आणलेला नवीन मोटार वाहन कायदा हा वाहन चालकांसाठी अत्यंत कठोर व जुलमी आहे. या काळ्या कायद्यानुसार अपघात झाल्यास ट्रक चालकास दहा वर्षांची शिक्षा तसेच सात लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. या काळ्या कायद्विरोधात वाहन चालकांमध्ये तीव्र संताप असून टँकरचालकांनी संप पुकारला आहे, या संपाला काँग्रेसचा पाठिंबा आहे. वाहन चालकांवर अन्याय करणारा जुलमी, अत्याचारी नवीन मोटार वाहन कायदा रद्द करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.दरम्यान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, भारतीय जनता पक्ष अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याचा राजकीय स्टंट करत आहे का? या पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, अयोध्येत प्रभूरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जात असताना हिंदु धर्माचे प्रमुख शंकराचार्य यांनीच अपूर्ण बांधकाम असलेल्या मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करु नये असे म्हटले आहे. अर्धवट बांधकाम असलेल्या मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे चुकीचे असून ते पाप ठरेल असे शंकराचार्य म्हणत आहेत. भाजपा स्टंट करत आहे का हे माहित नाही पण हिंदु धर्म भ्रष्ट करु नये अशीच बहुसंख्य हिंदुंची भावना आहे.नाना पटोले म्हणाले की, दुचाकी वाहन, टॅक्टर चालवण्यासही चालकांना भिती वाटावी असा जुलमी, कठोर व अत्याचारी मोटर वाहन कायदा मोदी सरकारने आणला आहे. या कायद्यामुळे स्वत:चे वाहन चालवण्यासही लोकांना भिती वाटत आहे. आधीच्या कायद्यानुसार अपघात झाला तर १–२ वर्षांची शिक्षा व १ हजार रुपयांचा दंड होता पण नवीन कायद्यानुसार १० वर्षांपर्यंत शिक्षा व ७ ते १० लाख रुपये दंडाची तरतूद आहे तसेच हा कायदा आता अजामिनपात्र आहे. या कठोर काळ्या कायद्याविरोधात जनतेत तीव्र नाराजी आहे. हा काळा कायदा मंजूर करून घेण्यासाठीच मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या १४६ खासदारांना निलंबित केले. या काळ्या कायद्याला काँग्रेस पक्षाचा विरोध असून चालकांनी पुकारलेल्या संपाला पाठिंबा आहे.नाना पटोले म्हणाले की, जागा वाटपावरून महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, मेरिटनुसारच जागा वाटप होणार असून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यासंदर्भात पत्रकार परिषदेतूनही भूमिका स्पष्ट केलेली आहे. भारतीय जनता पक्षाचा परभव करणे हेच काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लक्ष्य आहे. भाजपाविरोधात लढणाऱ्या सर्वांना बरोबर घेऊन ही लढाई लढू ही काँग्रेसची भुमिका आहे असे स्पष्ट करत उलट महायुतीतच जागा वाटपावरून तीव्र मतभेद आहेत, त्यांच्यात भयानक तणाव आहे परंतु भाजपा शेवटी ईडी, सीबीआयचा वापर करुन त्यांना शांत करेल, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला आहे.

# ही दोस्ती तुटायची नाय!

**बालपणीची मैत्री म्हणजे एकदम भन्नाट असते. नात्यांपेक्षा अगदी वेगळे आपल्या सगळ्यात जवळचे नाते असते. आपल्या सगळ्या गोष्टी माहीत असलेले. ज्याच्याशी मनातले काहीही बोलता येईल असे आणि संकटकाळी आपल्या पाठीशी उभे राहणारे अशी शंभर टक्के खात्री असलेली नाते म्हणजे बालपणीचे दोस्त असे वेगळेपण त्यांच्यामध्ये असते म्हणूनच बालपणीचे दोस्त सदैव आपल्या मनामध्ये राहतात. अलिकडे दोस्तीचे महात्म्य सांगणारे अनेक चित्रपट मालिका आणि पुस्तके बघावयास मिळतात. बालपणीचे सवंगडी आणि दोस्त जपले पाहिजे असा संदेश त्यातून मिळतो.एक गाणं आहे ही दोस्ती तुटायची नाय हे या बालपणीच्या मैत्रीसाठीच लिहिले असावे. हे गाणं म्हणजे दोस्तीला समर्पक अगदी तंतोतंत जुळणारी कवी कल्पना आहे.**






काल ३१ डिसेंबर. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आमच्यापैकी काही मित्रमंडळींनी एकत्र येण्याचा विचार केला. ठरले नियोजन पक्के झाले. आमच्यापैकीच असलेल्या सुधीर पारधी यांच्या निवासस्थानी एपी कक्षात बैठक रमली. गप्पा गोष्टी रंगल्या. अचानक आमच्यापैकी एक मित्र असलेले फेरीलँड स्कूलचे संस्थापक अध्यक्ष ड. युवराज धानोरकर यांना त्यांची गाडी पंक्चर असल्याचे लक्षात आले. माझी गाडी पंक्चर आहे. आपण टप्प्यावर जाऊन दुरुस्त करून घेऊया असे सुचविले. आमचे दुसरे मित्र किशोर पत्तीवार आणि मी असे आम्ही तिघेही भद्रावती येथील टप्प्यावर पोहोचलो. दुकानांत गाडीचा पंक्चर काढणे सुरु असताना ड.धानोरकर कुठल्यातरी विचारांमध्ये गढून असल्याचे आमच्या लक्षात आले.कारण त्यांना विचारले असता ते म्हणाले . माझ्या एका बालमित्राचा आज वाढदिवस आहे. तो गावाकडे असतो. त्याच्या वाढदिवशी कधी गेलो नाही असं आजवर झालं नाही. परंतु आज जाता आले नाही. आता रात्रही झाली.काय करावं सुचत नाही.त्यांना पुढे काय वाटले माहिती नाही. मग त्यांनी आम्हाला विचारले . आपल्याला बल्लारशाह (बामणी) ला जायचं आहे. तिथे त्याचे मूळ गाव आहे. तिथे तो असतो. आपण जायचे का? जाऊन दहा मिनिटे भेटू. केक कापू अन् लगेच परत फिरू. इथल्या मित्र मंडळींशी पुन्हा जॉईन होऊ. आम्ही लगेच होकार दिला.म्हटलं ठीक आहे. लगेच आमची कार बामणी गावाकडे धावायला लागली. तासाभरात आम्ही इच्छित स्थळी धानोरकरांच्या बालमित्राकडे पोहोचलो होतो. कार चालवताना त्यांनी सांगितले की, आम्ही जेव्हा लहान असताना प्राथमिक शाळेत शिकत होतो. तेव्हापासून आमचा मित्रांचा ग्रुप होता. सगळे वाढदिवसानिमित्ताने आम्ही एकत्र येत असतो. परंतु आज मला ते जाता आले नाही. अनेक सुखदुःखाच्या प्रसंगी आम्ही एकत्र आलो आहे. गरिबीच्या काळात एकत्र दिवस घालवले आहे. त्या आठवणी या निमित्ताने ताज्या होतात.

मित्राच्या घरी गावाकडील चार–पाच बाल मित्र एकत्र आले होते . कष्टकरी सर्वसाधारण आर्थिक स्थिती असणारी ती मंडळी असल्याचे त्यांच्या राहणीमानाहून लक्षात आले. अगदी हर्षोल्लासात त्यांचा वाढदिवसाचा उत्सव सुरू होता. ते सर्व वाढदिवसाच्या कार्यक्रमात आनंदी असले तरी त्यांच्या चेहऱ्यावर आपल्यापैकी एक मित्र आला नाही ही खंत जाणवत होती. तेवढ्यात आमच्या सोबत असलेले वकीलसाहेब त्यांना दिसले आणि सगळ्यांची कळी खुलली.बर्थडे बॉय नितीन खानोलकर, ताराचंद वाढई, मनोज भोयर, अशोक गेडाम, ओमप्रकाश कपारे, इंद्रजीत गेडाम आदी दोस्त एकमेकांना भेटले.गळाभेट झाली .त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. मित्रांना आमचीही ओळख करून देण्यात आली. त्या सगळ्यांनी त्यांच्यातील एक समजून आम्हाला सामावून घेतले. सोबत केक नेला होताच .तो कापला. थोडा वेळ गप्पागोष्टी झाल्या. आम्ही निघून आलो. सर्वांनी मिळून आम्हाला त्यांच्या बालपणीच्या अनेक आठवणी खुलून सांगितल्या. अनेक वर्षानंतर अशी गाढ मैत्री अनुभवायला मिळाली.निरोप घेत आम्ही गावाकडे निघालो एक अविस्मरणीय आठवणींचा ठेवा घेऊन.

मैत्री हे जगातील अतिसुंदर नातं आहे. त्याला ना वयाचे बंधन असते.ना जात, पात, धर्म, वंश, प्रांत यांचे कोणतेही बंधन राहत नाही. विचार जुळले की हे नातं जगा वेगळं बनतं. निःस्वार्थी भावनेने गुंतलेल्या या नात्यात नात्यापलीकडचा जिव्हाळा व आपुलकीचा ओलावा असते. मैत्रीमुळे दुराग्रह दूर होऊन आत्मियता वाढते. दृष्टिकोनाचा विस्तार आणि त्यातूनच जग जवळ येते. अनेकदा रक्ताची नाती प्रसंगी दूर जातील पण प्रेमाच्या भावनेने एकत्र आलेले मित्र हे सुखदुःखाच्या क्षणी निकोपपणे सोबतीला असतात हे मोठा अनुभव आहे.

मैत्री काय असते ते या दृष्टांतातून कळेल. एक खेकडा समुद्रकिनाऱ्यावर आपल्या तिरप्या चालीने वाळूवर काही रेखाटने रेखाटत होता. तितक्यात समुद्राची लाट आली. तिने खेकड्याच्या रेघोट्या पुसल्या. खेकड्याने त्या लाटेला रागाने विचारले. मी एवढ्या मेहनतीने काढलेल्या सुंदर रेघोट्या तू क्षणात येऊन पुसल्या. हे बरोबर नाही. तुझ्या त्या कृत्याचा मला फार राग आलेला आहे. मागे सरकताना ती लाट क्षणभर थांबून त्या खेकड्याला म्हणाली. या किनाऱ्यावर एक कोळी सावज शोधण्यासाठी फिरत आहे. मला वाटत नाही या रेघोट्यांच्या मदतीने तो तुझ्यापर्यंत पोहचावा आणि तू संकटात सापडावा.म्हणून मी तुझ्या रेघोट्या पुसल्या .दोस्ता मला तुला दुखवायचे नाही. परंतु कायमचे गमवायचेही नाही. अशी असते मैत्री.सतत परस्परांना जपण्यासाठी प्रसंगी थोडं रिस्क घेणारी. म्हणून म्हणावेसे वाटते. शरीरात रक्त नसेल तरी चालेल. पण आयुष्यात मैत्री ही हवीच. कितीही जुनी झाली तरी ती नेहमी वाटते नवीच.भारतीय परंपरेत मैत्रीला नेहमीच महत्त्व दिले गेले आहे. मित्र हा आपल्या चांगल्या वाईट दोन्ही गोष्टींचा साक्षीदार असतो म्हणून मैत्रीचे नाते इतर सगळ्या नात्यांपेक्षा वेगळं असतं. जेव्हा जेव्हा मैत्री या विषयावर चर्चा सुरू होते तेव्हा द्वापार काळातील कृष्ण सुदामाच्या मैत्रीचे उदाहरण लोक द्यायला विसरत नाही. कृष्णा आणि सुदामाची मैत्री ही सुवर्ण अक्षराने लिहिली गेली आहे.

# मध्य रेल्वेला आठ महिन्यांत १२ हजार कोटींचा महसूल

**सोलापूर :** मध्य रेल्वेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ८ महिन्यांत (एप्रिल ते नोव्हेंबर) १२ हजार ४९७ कोटी ४१ लाख रुपयांचा महसूल प्राप्त केला आहे. गेल्या वर्षी याच आठ महिन्यात १० हजार ८४८ कोटी ८९ लाख रुपयांचा महसूल होता. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा १५.२० टक्क्यांची वाढ झाली आहे.मध्य रेल्वेने या आठ महिन्यात १,०३९.२० दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली. गेल्या वर्षी या आठ महिन्यात ९४०.७८ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवासी वाहतुकीच्या आकड्यात १०.४६ टक्क्यांची वाढ झाली आहे. आठ महिन्यात प्रवासी वाहतुकीतून रेल्वेला ४ हजार ६९९ कोटी १० लाख रुपये मिळाले आहेत. गेल्या वर्षी या आठ महिन्यात ४ हजार ७७ कोटी ६२ लाख रुपयांचा महसूल मिळाला होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १५.२४ टक्क्यांची वाढ झाली आहे.या आठ महिन्यात वस्तू व सामानाच्या वाहतुकीतून ६ हजार १४६ कोटी ८३ लाखांचा महसूल मिळाला आहे. इतर कोचिंग, सामान, नॉन–फेअर महसूल तसेच विविध माध्यमांतून (विविध, पार्किंग, केटरिंग, विश्रामगृह, शौचालय वापर इत्यादीसह) यंदा १ हजार ६५१ कोटी ४८ लाखांचा महसूल मिळाला आहे. मध्य रेल्वेने उत्पन्नाला चालना देण्यासाठी विभागवार व्यवसाय विकास केंद्रांची (बीडीयू) स्थापना केली आहे. इतर भाडे व्यतिरिक्त महसूल उपक्रम आणि मुख्यालय कार्यालयातील विपणन व इतर तत्सम नावीन्यपूर्ण कल्पनांमुळे महसुलात वाढ झाली आहे.

## अशोकराव महल्ले यांचे निधन



पुलगाव – नजिकच्या कवठा येथील अशोकराव महल्ले (वय ६५) यांचे अल्प आजाराने दि.३१ डिसेंबर ला निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर कवठा येथे दि.१ जानेवारी २४ ला सकाळी वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले .

# महाराष्ट्रातील मातब्बर नेत्यांनी मोदी सरकारची वतनदारीची झुल पांघरली आहे का?–खा.कोल्हे



**पुणे–**हे मोदी सरकार २५ लाख कोटी मोठ मोठ्या उद्योगपतींचे कर्ज माफ करू शकत, पण आमच्या शेतकऱ्यांचं काही हजार कोटींचा कर्ज मोदी सरकार माफ करू शकत नाही. या महाराष्ट्रातल्या २ हजार ६६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि महाराष्ट्रातल्या सरकार सांगते की, आम्ही शेतकऱ्यांचे सरकार आहोत, असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी केला आहे.दरम्यान खासदार अमोल कोल्हे पुढे बोलताना म्हणाले की, कांद्याची निर्यात बंदी होऊन आज अनेक दिवस झाले तरीही सरकारमधील एकाही प्रभावशाली मंत्र्याने ही गोष्ट मोदी सरकारला ठणकावून सांगितली नाही, की निर्यात बंदी उठवा. जवळपास ८० टक्के दूध उत्पादक शेतकरी हा खाजगी दूध संस्थांना दूध घालतो, पण सरकार फक्त सहकारी संस्थांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांनाच अनुदान देतो. असे का. आणि मग शेतकऱ्यांच्या मनात प्रश्न पडत असेल एवढे मातब्बर मोठ–मोठे नेते सरकारमध्ये सामील आहेत ते मान वर करून सरकारला जाब का विचारत नाहीत. सर्वांप्रमाणे मला सुद्धा हा प्रश्न पडला होता की, हे नेते सरकारला जाब का विचारत नाहीत. त्याचे उत्तर मला आज एका सहकार्याने गायलेले पोवाड्यातून मिळाले असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.अमोल कोल्हे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला सर्वात जास्त विरोध कोणी केला होता, तर तो मुघलांन इतकाच मोघलांना जाऊन मिळणाऱ्या वतनदारांनी केला होता. का होता वतनदारांचा स्वराज्याला विरोध. आपली वतन जाऊ नये म्हणून, आपल्या वतनावर काहीतरी गदा येऊ नये म्हणून, आणि वतनदार ज्या कोणत्याही मोधालशही, आदिलशाही यांच्याशी हात मिळवनी करायला तयार होते. पण स्वराज्यामध्ये वतनदारी नव्हती, त्यामुळे स्वराज्यात सामील व्हायला कोणी तयार नव्हते. मग या वतनदारांची परिस्थिती काय होती. ज्यावेळी अफजलखानाने अनेक देवदेवतांचे मंदिरांवरती हल्ला केला, त्यावेळी खानाच्या ताफ्यातील मराठा सरदारांची रक्त खळवळले नसतील काय?. रक्त त्यांचेही सळसळत होते, मनगट त्यांचीही सळसळत होती, पण त्यांनी पांघरलेली झुल ही वतनदारीची होती.अमोल कोल्हे म्हणाले की, मान मांडलिकत्वाच्या ताब्यात होती, तेव्हा अफजलखानाला नजर उचलून बोलण्याची हिंमत नव्हती. की तू असे का करतो आहेस. आणि हाच इतिहास पुन्हा जागवण्याचे काम हीच परिस्थिती आज आमच्या महाराष्ट्रातील अनेक दिग्गज नेत्यांची झाली आहे का. झूल वतनदारीची पांघरली आहे. त्यामुळे केंद्र सरकारला उलट जाब विचारण्याची त्यांच्यात हिम्मतच उरली नाही. असं म्हणतात, लाचारीने मान पायाकडे झुकली की, नजरेला नजर मिळवून प्रश्न विचारता येत नाही. अशी परिस्थिती या राज्यातील राज्यकर्त्यांची झाली की काय असा प्रश्न पडतो. असा घणाघात खासदार अमोल कोल्हे यांनी शेतकरी संघर्ष मोर्चाच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांवर केला. महाराष्ट्रातील नेत्यांनी मोदी सरकारची मांडलिकत्वाची झूल पांगरी आहे काय असा प्रश्न केला आहे.

# भीमा कोरेगाव ; सलाम शूर सैनिकांना मानवंदना...!

कोरेगावची लढाई ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई १ जानेवारी १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण ८३४ सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ. स्टाँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत 'बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी'चे सुमारे ५०० महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने २८,००० सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरे करीत होते. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता.

दुसरे बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखालील सैन्य कंपनीच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना, अनपेक्षितपणे त्यांना कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते. पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे २,००० सैनिक पाठवले. कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ १२ तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली.

ही लढाई इंग्रज–मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज – मराठा युद्धाचा भाग होती. या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया



कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली.

पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना,अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. १८०० च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेली होती.

कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या ४९ सैनिकांची नावे कोरली. यामध्ये २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे – "One of the Triumphs of the British army of the Earth'.

महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध (विशेषतः पूर्वाश्रमीचे महार), अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते. आजच्या दिनी अशा शूर सैनिकांना मानवंदना.

**प्रविण बागडे,नागपूर**
**भ्रमणध्वनी – ९९२३६२०९१९**
**ई–मेल ग्रिींळपलरसवशसारळश्र.लो**

# सहकारी बँकेकडून साखरेच्या मूल्यांकनात वाढ



**माळीनगर :** खुल्या बाजारात साखरेच्या दरात झालेली वाढ विचारात घेऊन माल तारणातील खुल्या साखरेचा सुधारित मूल्यांकन दर ३१०० रुपयांवरून ३४०० रुपये प्रतिक्किंटल करण्याचा निर्णय राज्य सहकारी बँकेने घेतला आहे. तसेच कर्ज मार्जिन (दुरावा) १५ वरून १० टक्के केल्याने पोत्यामागे बँकेकडून आता ८५ टक्के ऐवजी ९० टक्के कर्ज दिले जाणार आहे.२८ डिसेंबर २०२३ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयाने ऊस उत्पादकांना ऊसबिले देण्यासाठी कारखान्यांना मोठी मदत होणार आहे. साखरेचे सुधारित मूल्यांकन ३४०० रुपये प्रतिक्किंटल केल्याने उचल दर ३०६० रुपये क्विंटल इतका राहणार आहे. साखरेचा मूल्यांकन दर वाढविल्याने सध्या कारखान्याकडे शिल्लक असलेल्या हंगाम २०२३–२४ मधील उत्पादित साखर पोत्यांपैकी विक्री योग्य अवस्थेत असलेल्या साखर पोत्यांचेच मूल्यांकन वरील दराने केले जाणार आहे.२०२३–२४ हंगामातील उत्पादित शिल्लक साखर यापूर्वी कळविल्यानुसार १० टक्के दुरावा राखला जाईल. तसेच एक वर्षावरील (जुन्या) साखर साठ्यावर पूर्वीप्रमाणेच प्रतिवर्ष पाच टक्के दुरावा वाढविला जाणार आहे. तीन वर्षावरील साखरसाठा कर्ज उचलीस पात्र असणार नाही. कारखान्याने मध्यम मुदत, आर.आर.टी.एल. कर्जाची वसुली नसल्याने हंगाम २०२३–२४ साठी वाढीव अल्पमुदत कर्ज मंजूर केले असल्यास अगर गाळपाअभावी टॅगिंगने पूर्ण कर्ज वसुली होणार नसल्यास त्यापोटी निगडित वसुली कोणत्याही परिस्थितीत केन पेमेंट वा अन्य कारणासाठी उपलब्ध करून दिली जाणार नाही. ही वसुली अल्पमुदत कर्जापोटी जमा करून घेतली जाणार आहे.बँक स्थायी तपासणी अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली कमी प्रतीची (खराब) साखर पोती तसेच प्रॉव्हिडंट फंड वा अन्य शासकीय यंत्रणेने जप्त केलेल्या साखर पोत्यांचे पूर्वीप्रमाणेच मूल्यांकन १३०० रुपये प्रतिक्विंटल दराने केले जाणार आहे. चालू गळीत हंगामात अंदाजित गाळपापेक्षा प्रत्यक्ष कमी गाळप होणार असल्याने बँक कर्जाच्या वसुलीकरिता प्रतिक्विंटल १०० रुपये अतिरिक्त टॅगिंग आकारले जाणार आहे.

# उदगीर नगरीत राज्यस्तरीय युवा महोत्सवाचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते शानदार उदघाटन

## युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शासन कटिबद्ध; पंतप्रधानांच्या उपस्थितीत १२ जानेवारीला नाशिक मध्ये राष्ट्रीय युवा महोत्सव : ना.संजय बनसोडे

**उदगीर :** राज्यातील युवकांचा खेळासह, सांस्कृतिक आणि इतर सर्व क्षेत्रात सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शासन कटिबद्ध असून त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. त्याचाच भाग म्हणून आशियायी स्पर्धेतील सहभागी खेळाडूसह, पदक विजेत्या खेळाडुंच्या बक्षिसाच्या रक्कमेत, तालुका, जिल्हा आणि विभागा पातळीवरच्या क्रीडा संकुलाच्या निधीत मोठी वाढ करण्याचा निर्णय क्रीडा व युवक कल्याण विभागाने घेतला. उदगीर येथे राज्य युवा महोत्सव पार पडत असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत १२ जानेवारीला नाशिकला राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलावर आयोजित राज्य युवा महोत्सवाचे उदघाटन क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे, माजी आमदार गोविंद केंद्रे, क्रीडा विभागाचे सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार रामेश्वर गोरे, प्रभारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके, ॲड. व्यंकट बेंद्रे, प्रशांत पाटील यांच्यासह शिवछत्रपती





पुरस्कार विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेते मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाने आशियायी स्पर्धेतील विजेत्या खेळाडुंना सुवर्ण पदक विजेत्याला १ कोटी, रौप्य पदक विजेत्याला ७५ लाख आणि कांस्य पदक विजेत्या खेळाडूला ५० लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला असून आता आशियायी खेळात सहभागी होणाऱ्या खेळाडूंनाही १० लाख रुपये देण्याचा निर्णय क्रीडा विभागाने घेतल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. राष्ट्रीय स्तरावर २९ ऑगस्ट हा मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा होतो तसाच ऑलिम्पिकमध्ये भारताचे नाव उज्वल करणाऱ्या कुस्तीपटू कै. खाशाबा जाधव यांचा १५ जानेवारी हा जन्म दिवस असुन हा दिवस राज्याचा 'क्रीडा दिन' म्हणून आपण घोषित केल्याची माहिती या वेळी ना.संजय बनसोडे यांनी दिली. देशात आणि राज्यात खेळाला मोठे प्रोत्साहन दिले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा क्षेत्रातही मोठे बदल घडून आले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात आपला देश जगात खेळाच्या क्षेत्रातही उज्वल कामगिरी करीत आहे. देशातले युवक खेळाकडे आता करियर म्हणून पाहत आहेत हे चित्र खूप आशादायी आहे, असे प्रतिपादन खासदार श्री. शृंगारे यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील आणि राज्यातील राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, शिव छत्रपती पुरस्कार विजेते यांचा विशेष गौरव करण्यात आला. उदगीरकरांसाठी सांस्कृतिक मेजवानी राज्य युवा महोत्सवा मध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून एक – दोन हजार कलाकार सहभागी झाले आहेत. त्यांच्या विविध स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्यातील काही गटांनी खुल्या मंचावर आपल्या कलेचे सादरीकरण केले. उदघाटनानंतर इंडियाज गॉट टॅलेंट या प्रसिद्ध शो मधील चमुने सादर केलेल्या नृत्याला उदगीरकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन प्रसिद्ध अभिनेत्री समीरा गुजर यांनी केले.

**तृणधान्य प्रदर्शनीचे उदघाटन**

जागतिक तृणधान्य वर्षानिमित्त युवकांना अन्नातील पोषणमूल्य कळावे, यासाठी कृषी विभागाकडून प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात राज्यातील विविध जिल्ह्यानी सहभाग नोंदविला आहे. त्याचे उदघाटन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदगीरसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मविआचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला:आता केवळ अंतिम शिक्कामोर्तब बाकी–खा.सुप्रिया सुळे

**पुणे–**आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आली आहे. त्या अनुषंगाने सर्वच पक्ष अंग झटकून तयारीला लागलेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी महाविकास आघाडीच्या लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याचे नमूद केले. तसेच विरोधी पक्ष आक्रमकपणे निवडणुकीच्या रणांगणात उतरणार असल्याचे संकेत दिले.काही दिवसांपूर्वी दिल्लीत शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीली सर्व पक्षांचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. त्यात आगामी लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला. त्यावर अनौपचारिकपणे शिक्कामोर्तबही झाला आहे. केवळ त्याची अधिकृत घोषणा बाकी



आहे. ही घोषणा पुढील ८–१० दिवसांत होईल, असे सुप्रिया सुळे यांनी सोमवारी याविषयी बोलताना सांगितले आहे.दुसरीकडे, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही या प्रकरणी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले की, पुढील १–२ दिवसांत महाविकास आघाडीच्या जागावाटपाचे चित्र स्पष्ट होईल. तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांची दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर काँग्रेसच्या पक्षांतर्गत बैठका झाल्या. तिन्ही पक्ष या प्रकरणी पुन्हा एकत्र बसतील. चालू आठवड्यात सर्व गोष्टी ठरतील असा मला विश्वास आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले.महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे ३ मोठे पक्ष आहेत. तर महाविकास आघाडीत काँग्रेस, शिवसेनेचा ठाकरे गट व राष्ट्रवादीचा शरद पवार गट आहे. पुढील काही दिवसांत प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीचा यात समावेश होऊ शकतो. तूर्त या आघाडीला मविआत समाविष्ट करण्याच्या मुद्यावर चर्चा सुरू आहे.

# सुप्रिया सुळे अन् अमोल कोल्हेंना अजित दादांनी निवडून आणलं:रुपाली चाकणकर

**पुणे–**सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हेंना अजितदादांनीच निवडून आणले, असे म्हणत अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार अमोल कोल्हे यांच्यावर टीका केली आहे. तसेच दादा सोबत नाहीत म्हणून तळ ठोकावा लागत आहे असा हल्लाही चाकणकर यांनी केला आहे.त्या म्हणाल्या, ''सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे अजितदादांमुळेच खासदार झाले आहेत. दादा सोबत नाही म्हणून तळ ठोकावा लागत आहे. सुप्रीया सुळे गेली १५ वर्ष अजितदादांमुळे निवडून आल्या आहेत'' असे चाकणकर म्हणाल्या. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये अजित पवार राष्ट्रवादी गट आणि महायुतीचा उमेदवार निवडून येईल असा दावाही चाकणकर यांनी केला आहे.तर अजित पवार



मुख्यमंत्री व्हावे ही आमची इच्छा आहे, असे वक्तव्य रुपाली चाकणकर यांनी केले आहे. अजित दादांना मुख्यमंत्री होताना पाहायचे असेल तर आम्हला काम करावेलागेल. आमचं स्वप्न आहे त्यासाठी आम्ही प्रयत्न करू दादा मुख्यमंत्री व्हावे हे सर्वांनाच वाटते'', असेही रुपाली चाकणकर म्हणाल्या. दरम्यान, अजित पवार महायुतीत गेल्यापासून ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा दावा सातत्याने वेगवेगळ्या पक्षातील किंवा त्यांच्याच नेत्यांकडून केला जात आहे.तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकांवर देखील रुपाली चाकणकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ''अजित पवारांनी २०२३ ला निर्णय घेतला तो विकासासाठी घेतला आहे. अनेक चांगले निर्णय घेतले अजित पवारांनी घेतले आहे. येणाऱ्या लोकसभा–विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीचा विजय होणार आहे. प्रत्येकाची लढण्याची इच्छा असते,स्पर्धक असतात त्यामुळे खडकवासलामध्ये अनेक इच्छुक आहेत'', असे चाकणकर म्हणाल्या.

# महायुतीत अद्याप जागावाटपाची चर्चा नाही अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे

**मुंबई–**सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप जागा वाटपाची चर्चा सुरू झाला नसल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. भाजपने महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ पैकी ४५ जागा जिंकण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यासाठी हा भगवा पक्ष अंग झटकून कामालाही लागला आहे. पण तटकरे यांच्या दाव्यामुळे महायुतीत जागावाटपाच्या मुद्यावरून मोठा वाद असल्याचे स्पष्ट झाले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे विरोधकांच्या महाविकास आघाडीने सोमवारीच आपले जागावाटप जवळपास निश्चित झाल्याचे स्पष्ट केले आहे.लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाचा तेढ सध्या निर्माण झालाय. तसेच जागावाटपावरुन बराच संभ्रम देखील असल्याचे पाहायला मिळत आहे. पण महायुतीमध्ये अद्यापही जागावाटपावरुन कोणतीही प्राथमिक चर्चा सुरु झाली नसल्याचा दावा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांनी केला आहे.दरम्यान सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, १४ जानेवारी रोजी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महायुतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. महायुतीमधील तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते या बैठकांना उपस्थित राहणार असल्याचे देखील सुनील तटकरे यांनी यावेळी म्हटले आहे.अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे म्हणाले की, आम्ही ४५ प्लस जागा



जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवूनच लोकसभा निवडणूक लढवणार आहोत. महायुतीच्या बैठकीसाठी तिन्ही पक्षांतील प्रमुख नेते, प्रदेशाध्यक्ष हे संबंधित जिल्ह्यांमध्ये उपस्थित राहतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकाच वेळेला बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. जागावाटपाची चर्चा ही यथावकाश आणि योग्य वेळी करण्यात येईलच. पण आम्ही एका गोष्टीवर ठाम आहोत की आम्ही ४५ प्लस उद्दिष्ट ठरवूनच लोकसभा निवडणूक लढवणार आहोत.महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे ३ मोठे पक्ष आहेत. तर महाविकास आघाडीत काँग्रेस, शिवसेनेचा ठाकरे गट व राष्ट्रवादीचा शरद पवार गट आहे. पुढील काही दिवसांत प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीचा यात समावेश होऊ शकतो. तूर्त या आघाडीला मविआत समाविष्ट करण्याच्या मुद्यावर चर्चा सुरू आहे.

# नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच बरसणार पावसाच्या सरी

**पुणे–**राज्यात नववर्षाचा उत्साह असताना मात्र काही भागांत पावसाच्या सरी कोसळणार आहेत. नववर्षाच्या सुरवातीच्या आठवड्यात राज्यात पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्यात पावसाळा पोषक वातावरण तयार होणार आहे. त्यामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.दरम्यान, आज राज्याच्या किमान तापमानातील वाढ कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे थंडीपासून काहीसा दिलासा मिळाला आहे. तर येत्या बुधवारपासून कोकणात आणि गुरुवारपासून मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे राज्यात नववर्षाचे स्वागत हे पावसानेच होण्याची शक्यता आहे.हिंदी महासागर आणि अरबी समुद्राच्या आग्नेयेकडे सध्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे वाऱ्यांची दिशा सध्या वायव्येकडे जाताना दिसत असून, ती दिवसागणिक आणखी तीव्र होत आहे. त्यामुळे येत्या काही तासांमध्ये या वाऱ्यांचे रुपांतर कमी दाबाच्या पट्ट्यात होऊन कोकण पट्ट्यासह राज्यातील काही भागांत पावसाच्या तुरळक सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशासह राज्यातील हवामानावर परिणाम झाल्याचे पाहायला मिळणार आहे.कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पुढील काही दिवस पावसाची शक्यता वर्तवली आहे. तर मध्य महाराष्ट्रातील १७ तसेच विदर्भातील अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात अशा एकूण २२ जिल्ह्यात १ ते ७ जानेवारी दरम्यानच्या आठवड्यात फक्त काही ठिकाणीच किंचित ढगाळ वातावरण राहू शकते. या जिल्ह्यांच्या तुरळक ठिकाणी अगदी किरकोळ पावसाची देखील शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे.दरम्यान, डिसेंबर महिन्याच्या अखेरीस राज्याच्या किमान तापमानात वाढ झाल्याने गारठा कमी झाला आहे. आज राज्याच्या किमान तापमानातील वाढ कायम राहण्याची शक्यता असल्याने थंडी कमी झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्र चांगलाच गारठला होता. अनेक जिल्ह्यांत तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली गेला होता होता. मात्र आता या थंडीपासून दिलासा मिळाला आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून रात्री बाराच्या ठोक्याला रक्तदान;ठाण्यात नववर्षानिमित्त रक्तदानाची परंपरा ठेवली कायम

**ठाणे–**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नववर्षानिमित्त ठाण्यात रक्तदान केले आहे. धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरु केलेल्या रक्तदान शिबिराला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सहभागी होत मध्यरात्री १२ वाजता रक्तदान करुन नववर्षाचे स्वागत केले. तसेच ज्याचा जीव वाचवायचा आहे त्याला रक्ताशिवाय पर्याय नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. दरम्यान, ठाण्यात नववर्षाच्या स्वागतानिमित्त रक्तदानाची २९ वर्षांची परंपरा कायम ठेवली आहे.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ''रक्तानंद ग्रुप आणि शिवसेना मिळून गेली २९ वर्ष अखंडितपणे हा रक्तदानाचा महायज्ञ सुरू आहे. काही उपक्रम सुरू होतात पण कालांतराने बंद होतात. मात्र ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी सुरू केलेल्या उपक्रम तसेच अखंडितपणे सुरू आहे. मी स्वतः ३१ डिसेंबरला रक्तदान करतो. एक आगळवेगळा रक्तदान शिबिर महा रक्तदान शिबिर या ठिकाणी दरवर्षी आयोजित केला जातो. रक्ताशिवाय दुसरा पर्याय अद्याप तरी निर्माण झालेला नाही'', असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.''नवीन वर्षाचा शुभारंभ रक्तदानाच्या महायज्ञाद्वारे गेली २९ वर्षे आपण करत आहे. दिघे साहेबांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये या उपक्रमाची सुरुवात पहिली केली. आनंद दिघे साहेबांनी जे उपक्रम सुरू केले ते आपण कायम ठेवले. या रक्तदान शिबिरामध्ये कुणालाही बोलवावे लागत नाही. कोणाला निमंत्रण पाठवावा लागत नाही, आपोआप सगळे लोक या ठिकाणी येतात शेकडो लोक येतात आणि रक्तदान करतात याचे वैशिष्ट्य आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.मी जनतेचा कार्यकर्ता आहे. कालही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो आजही कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. मुख्यमंत्र्यांची व्याख्या मी नेहमी सांगत असतो. सीएम म्हणजे चीफ मिनिस्टर असले तर माझ्यासाठी सीएम म्हणजे कॉमन मॅन आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी जेवढे काही करता येईल ते मी करत आहे'', अशी भावना शिंदेंनी यावेळी व्यक्त केली.''२२ जानेवारी रोजी अयोध्यामध्ये राम मंदिराचे उद्घाटन होत आहे. अयोध्येत राम मंदिर व्हावे हे करोडो राम भक्तांचे स्वप्न होते. तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब आणि धर्मवीर आनंद दिघे यांचेही हेच स्वप्न होते. तसेच बाळासाहेबांचा वाढदिवस म्हणजे जयंतीच्या पूर्वसंध्येला त्याचे लोकार्पण देशाचे प्रधानमंत्री मोदी यांच्या शुभहस्ते होत असल्याने ही बाळासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.



# राज्यस्तरीय आव्हान शिबिरातील रॅलीने घडविले महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन



**गडचिरोली । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय दहा दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर 'आव्हान' गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. सातव्या दिवशी राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर आव्हान ची रॅली सुमानंद सभागृह पासून शहराच्या मुख्य मार्गाने मार्गक्रमण करत निघाली. तत्पूर्वी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी मशाल पेटवून तसेच रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. याप्रसंगी मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, गोडवाना विद्यापीठाचे रासेयो संचालक तसेच आवाहन २०२३ चे समन्वयक डॉ. शयाम खंडारे, सहसमन्वक डॉ. प्रिया गेडाम, एन. डी आर. एफ. चे निरीक्षक पंकज चौधरी , नागपूर विद्यापीठाचे परीक्षक सतिश चाफले, जळगाव विद्यापीठाचे परीक्षक सचिन नाद्रे, नागपूर विद्यापीठाचे रासेयो संचालक सोपानदेव पिसे,गडचिरोली जिल्हा रासेयो समन्वयक डॉ.श्रीराम गहाणे, चंद्रपूर जिल्हा समन्वयक विजया गेडाम,विभागीय समन्वयक उषाताई खंडाळे, डॉ पवन नाईक , डॉ. गुरुदास बल्की ,प्रदीप चाफले आदी उपस्थित होते.धार्मिक सलोखा, एकात्मता, भारतीय संविधान, वारकरी संप्रदाय, विज्ञान तंत्रज्ञानामुळे झालेली प्रगती, पर्यावरण, मतदान जागृती अशा अनेक विषयांची हाताळणी करणारे देखावे, नृत्य, पोस्टर्स,विविध विषयांवरील फलक आणि सजीव देखावे या वेळेला राज्यातील विविध विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांनी सादर केले. यातून विविधतेतून एकता आणि महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी घडविले.या रॅलीत गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी रेला नृत्य तसेच डॉ. प्रकाश आमटे आणि मंदाकिनी आमटे यांची वेशभूषा , झाडीपट्टी रंगभूमीवर पोस्टर, अभय बंग, बाबा आमटे यांचे कार्य, जल, जंगल, जमीनचे महत्व, या भागातील संस्कृतीक वारसा, येथील आदिवासी संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी घडविले. वाहतुकीला कुठलीही अडचण निर्माण न होऊ देता अगदी व्यवस्तीतरित्या ही रॅली गडचिरोली शहरातील सुमानंद सभागृहापासून इंदिरा गांधी चौक , पुढे शहरातील मुख्य मार्गाने मार्गक्रमण करत सुमानंद सभागृहात विसर्जित करण्यात आली. या संपूर्ण रॅलीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.महाराष्ट्रातील २२ विद्यापीठांमधील १००० विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते यामध्ये ३७पुरुष संघ व्यवस्थापक, ३७ महिला संघ व्यवस्थापक यांचा समावेश होता.या संपूर्ण रॅलीत एन. डी. आर. एफ.च्या चमूनेही मोलाचे योगदान दिले. या रॅली दरम्यान सिनेट सदस्य स्वरूप तारगे याचीही उपस्थिती लाभली.रॅली यशस्वी करण्याकरीता विद्यापीठातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले.

# प्रमोद नागापुरे कडुन मदतीचा हात



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खैरगांव येथे नागदिवाळीचे आयोजन करण्यात आले आहे.नागदिवाळी निमित्ताने दोन दिवसाचे कार्यक्रम आयोजित केले आहे.दरवर्षी प्रमाने या वर्षीही १ जानेवारी ते २ जानेवारी असे दोन दिवसाचे कार्यक्रम आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते तसेच विमा सल्लागार प्रमोद नागापुरे यांच्या कडुन एक टिन खाद्य तेल भेट देण्यात आले .

यावेळी माजी उपसरपंच रघुनाथ दडमल तसेच माजी पोलिस पाटील विठ्ठल पाटील नन्नावरे उपस्थित होते.मागील वर्षी सुद्धा एक टिन खाद्य तेल देण्यात आले होते. प्रमोद नागापुरे हे एक विमा सल्लागार म्हणून काम करतात. सामाजिक व धार्मीक कार्यात आवड असल्याने व दान वृत्ती असल्याने अनेक कार्यक्रमात मदत करतात. वरोरा तालुक्यात कुठेही कार्यक्रम असला की ते भेट देतात. आपल्या ईच्छेनुसार मदत करतात. असाच ऊपक्रम ते स्वतःच्या गावात राबवतात. नागभीड तालुक्यातील कोटगांव हे त्यांचे मुळच गाव आहे. गावात होणाऱ्या कार्यक्रमाला सुद्धा मदत करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असो की शिवजयंती यामध्ये मोलाचा वाटा असतो. स्वतःच्या गावात शाळेला पुस्तकांचा संच भेट देणे,गावात वृक्षरोपन करणे. शाळेला भेट देणे, ग्रा.प. ला वृक्ष रोपन करणे असे विविध उपक्रम घेत असतात.तसेच खैरगांव येथील हनुमान मंदीराला मदत केली. या त्यांच्या उदार कार्यामुळे खैरगाव येथील सरपंच संदिप दडमल, माजी पोलिस पाटील विठ्ठल नन्नावरे व गावातील नागरीकांनी आभार व्यक्त केले आहे.

# बल्लारपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी बुक वाटप



**बल्लारपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील वीर भगतसिंह वाचनालय बामणी येथे कॉंग्रेस नेते दिनेश दादा पाटील चोखारे यांच्या वतीने स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बुक वाटप करण्यात आले.नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी हा कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमात कॉंग्रेस नेते दिनेश दादा पाटील चोखारे यांच्यासह, ओबीसी नेते सचीन राजुरकर, ओबीसी विभागाचे तालुका अध्यक्ष विवेक खुटेमाटे आदी उपस्थित होते.. कार्यक्रमात दिनेश दादा पाटील चोखारे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षा ही एक कठीण परीक्षा आहे. या परीक्षांसाठी चांगली तयारी करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थ्यांना पुरेशी पुस्तके, माहिती आणि मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करून त्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमात वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली. या पुस्तकांमध्ये विविध विषयांचे संदर्भ ग्रंथ, मॉक टेस्ट, प्रश्नपत्रिका आदींचा समावेश आहे. या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी मोलाची मदत होणार आहे.

# तायवाडे कॉलेजचे डॉ.वाटाणे विदर्भ भूषण पुरस्कार (२०२३)ने सन्मानित




**नागपूर । प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागील पंचवीस वर्षांपासून अग्रगण्य असणा-या विद्याभूषण फाउंडेशन तर्फे देण्यात येणारा 'विदर्भ भूषण पुरस्कार (२०२३) हा डॉ. राजेंद्र वाटाणे यांना साहित्य संशोधनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त आदिवासी विभाग डॉ. रवींद्र ठाकरे, जागतिक वल्ड बैंकेचे सल्लागार डॉ. रमेश ठाकरे, संचालक डॉ. भूषण भस्मे व अन्य मान्यवर उपस्थित होते. डॉ. राजेंद्र वाटाणे हे तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी येथे १९९६ पासून मराठी विषयाचे प्राध्यापक असून विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर येथे सचिव तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेच्या सचिव पदी कार्यरत आहे. त्यांची स्वतंत्र व संपादित २५ पुस्तके प्रकाशीत असुन ७५ संशोधनपर लेख प्रसिध्द झाले आहे ,तसेच त्यांच्या मार्गदर्शनात १६ विद्यार्थ्यांना आचार्य पदवी आणि २५ विद्यार्थ्यांना एम.फील.पदवी प्राप्त झाली आहे.अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांस्कृतिक भवन संस्काराचे केंद्र व्हावे

## आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते सभागृहाचे भूमिपूजन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या साहित्यामध्ये महिलांचा विचार केला आहे. महिलांनी शिक्षित होऊन कुटुंबाला पुढे न्यावे. मुलांना चांगले संस्कार देऊन त्यांना घडवावे. शासनाने महिलांना आरक्षण दिले, असतानाही महिला पुढे येत नाहीत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी पुढे यावे. मुला-मुलींना चांगले संस्कार द्यावेत. ग्रामगीतेचा महिलांनी अभ्यास केला, तर त्यांना प्रगतीच्या अनेक वाटा सापडतील. ग्रामगीतेमध्ये राष्ट्रसंतांनी महिलांच्या उन्नतीवर भर दिला आहे. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या विचारांचा घरामध्ये जागर झाला पाहिजे. असे आवाहन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. एकार्जुना येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांस्कृतिक भवनाच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अ. भा. श्री. गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी सेवाधिकारी लक्ष्मणराव गमे, अ. भा. श्री. गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी जिल्हा सेवाधिकारी रुपलाल कावळे, एकार्जुना सरपंच उज्वला थेरे, ग्रामसेवक रजनी घुगुल, सामाजिक कार्यकर्ते बसंत सिंग, बाळू चिंचोलकर, सामाजिक कार्यकर्ते मनोज चिंचोलकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार प्रतिभा धानोरकर म्हणाले कि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून ग्रामीण विकासाला दिशा दिली. ग्रामगीतेमध्ये मातृशक्तीला विशेष स्थान दिले आहे. घर, कुटुंब यावर विशेष भर दिला. ग्रामगीतेतील विचार महिलांनी आत्मसात करून त्यानुसार वाटचाल करावी. राष्ट्रसंतांचे विचार मनामनात रुजावे, भावी पिढीसोबत राष्ट्रसंतांचे विचार पोहचविण्यासाठी युवा पिढींनी ग्रामगीतेचे ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रसंतांच्या सर्व कार्यक्रमात ग्रामगीतेचे वाचन करण्याचा उपक्रम राबविण्यात यावा, असे आवाहन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले.

# साठगांव येथे श्रीदत्तात्रेय प्रभू यात्रा महोत्सव साजरा



**चिमूर । प्रतिनिधी**

साठगांव येथील महानुभाव श्रीदत्त मंदिरात सुरेश रामचंद्रपाटील गावंडे, विश्वस्त मंडळ व कालाकमेटी यांचे सौजन्याने श्रीदत्त जयंती यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.दिनांक २७/१२/२०२३ रोजी श्रीदत्त प्रभू जन्मोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी सकाळी विशेषास मंगलस्नान, उटी, वस्त्र, विडाअवसर, उपहार व आरती समर्पित करण्यात आली. त्यानंतर गीतापाठ व पारायण आदीचे वाचन करण्यात आले. महंत वंकीराजदादा यांचे शुभहस्ते तर तपस्विनी लताताई कविश्वर यांचे उपस्थित धर्मध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी साठगांव, कोलारी, जवराबोडी येथील भजनाच्या गजरात तर वाद्याचे निनादात श्रीदत्तप्रभूचे नामघोषात विशेषाची गावातून रथशोभा यात्रा काढण्यात आली. याप्रसंगी गावामध्ये या रथशोभा यात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करून विशेषास विडाअवसर व उपहार समर्पण करून गावातील काही सद्भक्त मंडळींकडून रथशोभा यात्रेनिमित्य नास्ता, अल्पोपहार, चहापान व फळांचे वाटप करण्यात आले. दिनांक २८/१२/२०२३ रोजी सकाळी धार्मिक पुजाअवसर करून गुरुदेव भजन मंडळ साठगांव यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. आचार्य श्री.एकोबासबाबा शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली धर्मसभा घेण्यात आली. अध्यक्षीय भाषणात माणसाला माणसाची भिती निर्माण झाली असून जिवाचा उध्दार करण्यासाठी ज्ञान व संत सहवास महत्वाचा आहे. माळ घातली म्हणून माळकरी होत नाही तर उपदेश घेतला म्हणून उपदेशी होत नाही, त्याकरिता सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचे आचरे तयाचा धर्म हे सुत्र अमलात आणण्याची गरज आहे. श्रध्दा असावी परंतु अंधश्रद्धा नसावी, आपणास दत्त समजला पाहिजे असे बोधपर व्यक्त केले.या धर्मसभेचे उद्घाटन दिपप्रज्वलन करून आचार्य श्री.मुधोव्यासबाबा शास्त्री यांनी केले. याप्रसंगी धर्माधर्मातील वादामुळे धर्म युद्ध पेटले असून मानवता हाच खरा धर्म आहे, तर शाकाहार हाच मानव आहार आहे. व्यसन सोडा जीवन जोडा असा संदेश उद्घाटनपर विचार व्यक्त करताना दिला. प्रमुख पाहुणे म्हणून महंत कृष्णराजदादा, नानुदा दर्यापूरकर, तपस्विनी लताताई शास्त्री व सुरेखाताई दर्यापूरकर हे होते. ह.भ.प. श्री पंजाबराव आंभोरे यांचे गोपालकाल्याचे बोधपर कीर्तन झाले. यावेळी सरपंच अक्षय मेश्राम, उपसरपंच प्रितीताई दिडमुठे आवर्जून उपस्थित होते. शेवटी दहीहांडी फोडून गोपाळकाला व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोदबाबू गावंडे, प्रास्ताविक राहुल सुरेश गावंडे तर आभारप्रदर्शन श्री बोबडे यांनी केले. या यात्रेकरीता पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता आशीष वैद्य, मयूर सातपुते, राजू भोयर, मनोज लेदाडे, अविनाश आजवलकर, दिपक भारती, शंकर भांगे, मोनिष गावंडे, रोशन गावंडे आदीनी परीश्रम घेतले. या यात्रेनिमित्त नवयुवक दुर्गा उत्सव नाट्य कला मंडळ, साठगांवचे सौजन्याने धनंजय स्मृती रंगभूमी वडसा प्रस्तूत संगीत - तुच माझी सौभाग्यवती या तीन अंकी नाटकाचा प्रयोग जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात दाखविण्यात आला. तसेच राकेश येवले व मित्र परिवार तर्फे श्री साईनाथ ब्लड सेंटर नागपूर यांचे सौजन्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .